## नियमित दिवाणी दावा क्र.७०३/२०२० जुना रे.दि.मु.नं.१३०/२०१५ मधील नि.२९ खालील आदेश

**(CNR No.MHSN150061512020)**

प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' हा हुकुम रद्द होणेकरिता दाखल केलेला आहे.

(२) प्रतिवादी यांनी त्यांच्या प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादीविरुध्द सरसनिरस मानाने वाटप होऊन पृथक व अलग कब्जा मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सदर दाव्याचे कामी वादी यांनी नि.१४ वर सरतपासाचे ॲफिडेव्हीट दाखल केले आहे. त्यावर दि.२५.०१.२०१९ रोजी प्रतिवादी यांच्याविरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला. आहे. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी नं.१ याला पॅरालेसीस झालेला असून त्याला हिंडता फिरता येत नाही. तसेच त्याची पत्नी कोरोनामध्ये मयत झाली आहे. तसेच प्रतिवादी नं.२ हे शेतकरी कुटूंबातील असल्यामुळे त्यांना कायदयाबाबतची माहिती नाही. तसेच उलटतपास नाही असा आदेश पारीत झाल्यानंतर कोरोना महामारीमुळे कोर्टाचे कामकाज बंद होते. त्यामुळे त्यांना साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास घेता आला नाही. तरी प्रतिवादींविरुध्द साक्षीदार यांचेबाबत झालेला 'उलटतपास नाही' हा हुकुम रद्द करणेचा आदेश व्हावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

(३) वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी प्रस्तुत अर्जावरच म्हणणे सादर केले आहे. वादीच्या कथनानुसार त्यांनी सरतपासाचे शपथपत्र सन २०१७ साली दाखल केले असून वादी ही वयस्कर असून प्रतिवादींनी केलेली कथने अमान्य करुन अर्ज रद्द करणेची विनंती केली आहे.

(४) नि.२९ वरील अर्ज, त्यापृष्ठयर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व अर्जावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीतर्फे साक्षीदार यांचा उलटतपास प्रतिवादी यांनी न घेतल्याने त्यांच्याविरुध्द दि.२५.०१.२०१९ रोजी 'उलटतपास नाही' हा आदेश होऊनदेखील त्यांनी वेळेत आदेश रद्द करुन उलटतपास घेऊ शकलेले नाहीत. परंतु, प्रतिवादींमार्फत साक्षीदारांचा उलटतपास झाल्यास दाव्याचे कामकाज पुढे चालून दावा गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे दाव्याचे स्वरुप व कोरोना महामारीमुळे कोर्टाचे कामकाज बंद असलेला कालावधी विचारात घेता सदरचा अर्ज वादी साक्षीदार र.रु.३००/- इतका खर्च प्रतिवादींनी देणेचे अटीवर मंजूर करणे न्यायोचित वाटते. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रतिवादी यांचा नि.२९ वरील अर्ज वादी यांना र.रु.३००/- देणेचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

Sd/-

विटा.
दि.२८.०१.२०२२.

(दीपाली शिवाजी चोथे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा, जि.सांगली.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of typist | :- | G.S.Bhasme, |
| Name of the Court | :- | Smt. Deepali S. Chothe<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 28.01.2022 |
| Order signed by P.O. on | :- | 28.01.2022 |
| Order uploaded on | :- | 31.01.2022 |